जवळ नाहीं कोणी अवांतर । बाबाच एकले असती गादीवर ॥
साधूनिया ऐसा अवसर । धरावे चरण बाबांच ॥ १२८ ॥
करीत निश्चय सपटणेकर । फळासि आला त्यांचा निर्धार ॥
होऊनिया सद्गदितांतर । धरीत चरण बाबांचे ॥ १२९ ॥
पायावरी ठेवितां शिर । बाबा तयावर ठेवित निजकर ॥
पादसंवाहन करित सपटणेकर । आली एक बाई धनगर तों ॥१३०॥
बाई येतांच तेथवर । रगडूं बैसली बाबांची कंबर ॥
बाबा नित्यक्रमानुसार । वार्ता तिजबरोबर करितात ॥ १३१ ॥
वार्तेचा त्या चमत्कार । लक्षपूर्वक सपटणेकर ॥
ऐकतां ती त्यांचीच समग्र । अक्षरें अक्षर आढळली ॥ १३२ ॥
जरी होकार धनगरी देत । सपटणेकर आश्चर्यभरित ॥
अपुलेच वृत्त बैसले ऐकत । तेणे ते चकित अंतरीं ॥ १३३ ॥
गोष्ट ती एका वाणियाची । परी वस्तुतः होती त्यांची ॥
त्यांतही त्यांचे मयत मुलाची । वार्ता मृत्यूची निघाली ॥ १३४ ॥
कोणी अत्यंत परिचित । नातेवाइक सांगे वृत्त ॥
जन्मापासून मरणापर्यंत । तैसें तें साद्यंत कथियेलें ॥ १३५ ॥
बाईलागी सांगती कथा । तिचा न कथेशीं संबंध तत्वता ॥
ती तो पितापुत्रांची वार्ता । विषय सर्वथा दोघांचा ॥ १३६ ॥
असो ऐसी निजकथा । साईमुखें सपेटणेकर ऐकतां ॥
परम विस्मय जाहला चित्ता । बाणली आदरता साईपदीं ॥१३७॥
वाटलें तया मोठे कौतुक । बाबांला ही कैशी ठाऊक ॥
परी जैसा करतलामलक । तेवी हें सकळिक बाबांना ॥ १३८ ॥
स्वस्वरूप स्वयें आपण । तयाचें विश्व कुटुंब जाण ॥
त्यांना विश्वचि नटला पूर्ण । तीच ही खूण साईची ॥ १३९ ॥

एकात्मतेचा विस्तार । तोच कीं साईचा अवतार ॥
तयास कैचें आपपर । स्वये सविस्तर जगरूप ॥ १४० ॥
विनटला जो परमपुरुषा । तया कैची द्वैतभाषा ॥
द्रष्टा दर्शन अथवा दृश्या । नातळे आकाशा जणु लेप ॥ १४१ ॥
बाबा महान अंतर्ज्ञानी । ऐसें येतांच तयांचे मनीं ॥
बाबा काय तया लागुनि । वदले ते सज्जनीं परिसीजे ॥ १४२ ॥
बोट दावूनि तयासमोर । बाबा साश्चर्य काढिती उद्गार ॥
मारिले म्हणे मी याचें पोर । आरोप मजवर हा ठेवी ॥ १४३ ॥
मी लोकांचीं पोरें मारितो । हा का मशीदीस येऊन रडतो ॥
बरें मी आतां ऐसें करितों । पोटासीं आणितो पुत्र त्याचा ॥१४४॥
जसा मेलेला रामदास । दिला माघारा त्या बाईस ॥
तैसाच पुनश्च त्याचिये मुलास । आणितों मी पोटास त्याचिया १४५
ऐस ऐकून सपटणेकर । तिष्ठत लावुनि बाबांकडे नजर ॥
ठेवूनि त्याच्या मस्तकीं कर । बाबा त्या धीर देतात ॥ १४६ ॥
म्हणती हे पाय पुरातन फार । जाहली तुझी काळजी दूर ॥
पूर्ण भरवंसा ठेव मजवर । कृतार्थ लवकर होसील ॥ १४७ ॥
करीत असतां पादसंवाहन । परिसतां बाबांचें मधुवचन ॥
सपटणेकर सद्गदित नयन । पदाभिवंदन करीत ॥ १४८ ॥
आले अष्टभाव दाटून । नयनीं आनंदाश्रू जीवन ॥
तेणें बाबांचें पादक्षाळण । प्रेमें प्रक्षाळण मग केलें ॥ १४९ ॥
पुन्हां बाबांनीं मस्तकीं हात । ठेऊनि म्हणाले बसावे स्वस्थ ॥
तेव्हां सपटणेकर बिऱ्हाडीं परत । आले आनंदीत मानसें ॥ १५० ॥
नैवेद्याची केली तयारी । देऊनिया निज युवती करीं ।
पूजा आरती जाहलियावरी । ताट तें सारीत बाबांपुढें ॥ १५१ ॥

मग प्रोक्षूनिया पात्रास । करोनि सविधि नेत्रस्पर्श ॥
प्राणापान व्यानादिकास । अर्पोनि मग बाबांस समर्पिला ॥१५२॥
मग अनुसरून नित्यक्रमास । बाबांचा होतां हस्तस्पर्श ॥
स्वीकारितां नैवेद्यास । वाटला हर्ष सपटणेकरा ॥१५३॥
मग तत्रस्थ इतर भक्त । होते बाबांचे पाया पडत ॥
शिरले सपटणेकर त्या गर्दीत । पुनश्च नमस्कारित त्वरेनें ॥ १५४ ॥
असो ऐसिया त्या घाईत । मस्तका मस्तक आथडत ॥
बाबा तेव्हां सपटणेकराप्रत । कैसे अनुवादत सथपणें ॥ १५५ ॥
अरे कशाला वारंवार । नमस्कारावर नमस्कार ।
पुरे तो केला एकवार । आदरसत्कारपूर्वक ॥ १५६ ॥
असो ते रात्रीं होती चावडी । सपटणेकर अति आवडी ॥
प्रेमें निघाले पालखी अघाडी । आनंद परवडी दंडधारी ॥ १५७ ॥
असो ही चावडी मिरवणूक । श्रोतयांपूर्वींच आहे ठाऊक ॥
तरी पुनरुक्ति आवश्यक । विस्तारकारक वर्जियेली ॥ १५८ ॥
असो पुढें ते रात्रीला । ही बाबांची अगाधलीला ॥
बाबा दिसले सपटणेकराला । जणु पांडुरंगालाच पाहतों ॥ १५९ ॥
असो पुढें मागतां आज्ञा । जेऊन जावें झाली अनुज्ञा ॥
न करितां यत्किंचित अवज्ञा । निघाले मग दर्शना जातांना ॥१६०॥
इतक्यांत मग त्यांचिये मना । एकाएकीं उठली कल्पना ॥
बाबा आतां मागतां दक्षिणा । ती मी पुरविणार कैसेनी ॥ १६१ ॥
से गांठीस होते ते सरले । गाडीभाड्याचे पुरतेच उरले ॥
"दक्षिणा दे" बाबा जर वदले । उत्तर ठरविलें मनानें ॥१६२॥
मागावयाचे आधींच द्यावा । रुपया एक हातीं ठेवावा ॥
पुन्हा मागतां आणखी अर्पावा । नाहीं म्हणावा तयापुढें ॥ १६३ ॥

अग्निरथाचे भाड्यासाठीं । आवश्यक तेचि ठेविले गाठीं ॥
ऐसें बाबांस सांगावे स्पष्टोक्ति । ठरवोनि भेटीस ते गेले ॥ १६४ ॥
पूर्वील कृतनिश्चयानुसार । रुपया एक ठेवितां हातावर ॥
आणिक एकचि मागितला त्यावर । देतां ते भरपूर अनुवादले।१६५
म्हणाले हा घे एक नारळ । स्वस्त्रियेच्या ओटींत घाल ॥
आणीक मग तूं जाई खुशाल । सोडूनि तळमळ जीवाची ॥ १६६ ॥
पुढें जातां महिने बारा । पुत्र आला त्यांचिये उदरा ॥
घेऊनि आठा मासांचिया लेकुरा । आलीं तीं माघारा दर्शना॥१६७॥
मुलगा घातला बाबांचे चरणीं । काय संतांची नवल करणी ॥
मग तीं दोघें जोडूनि पाणी । करिती विनवणी ती परिसा ॥१६८॥
या उपकारा साईनाथा । केवीं उतराई व्हावें आतां ॥
आम्हा कांहींच कळेना सर्वथा । ठेवितों माथा चरणावर ॥ १६९ ॥
हीन दीन आम्ही पामर । कृपा असावी अनाथांवर ॥
आतां येथून पुढें निरंतर । चरणीं तव थार असावा ॥ १७० ॥
जागृती माजी तैसेंच स्वप्नीं । नाना तरंग उठती मनीं ॥
उसंत नाहीं दिवस रजनी । तरी तव भजनीं लावी अम्हा ॥ १७१ ॥
असो तो मुलगा मुरलीधर । आणीक दोन भास्कर दिनकर ॥
यांचिया समवेत सपटणेकर । प्रसन्नांतर जाहले ॥ १७२ ॥
मग ते सर्व घेऊन भार्या । करूनि वंदन सांई सदया ॥
साधूनि चंचल मनाचे स्थैर्या । होऊनि कृतकार्य परतले ॥ १७३ ॥
कथा सांगावी संकलित । होता मनीं आरंभीं हेत ॥
परी वदविता साईनाथ । तेणें हा ग्रंथ विस्तारला ॥ १७४ ॥
तयासी हा हेमाड शरण । पुढील कथेचें अनुसंधान ॥
तात्पर्यार्थ दिग्दर्शन । श्रोतयां लागून करीतसे ॥ १७५ ॥

कथा ती याहून बहुगोड ! चमत्काराची जया आवड ॥
ऐसिया एका भक्ताचें कोड । पुरविलें नितोड साईनीं ॥ १७६ ॥

लोक वर्णितां साईचे गुण । दोषदर्शी देखे अवगुण ॥
स्वयें न स्वार्थपरमार्थपरायण । दोषैक दर्शन हेतू मनीं ॥ १७७ ॥

असतील साईबा संत । तरी ते मज देतील प्रचीत ॥
मजला अनुभव आलिया विरहित । मी त्यां यत्किंचित मानीना॥१७८

केवळ परीक्षा पहावयास। गेलियाची ही इच्छा पुरत ॥
हीच कथा पुढील अध्यायात श्रवण करोत सच्छ्रोते ॥ १७९ ॥

स्वस्ति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्री साई समर्थसच्चरिते । साशंकभक्तानुग्रहकरणं ॥
नाम अष्टचत्वारिंशोऽध्यायःसंपूर्णः ।

॥ श्रीसद्गुरुसाईनाथार्पणमस्तु ॥
॥ शुभंभवतु ॥

## वर्गणीदारांकरितां

१. श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारास वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२. श्रीसाईलीला प्रसिद्ध झाल्याबरोबर वर्गणीदारांकडे रवाना होते. अपरिहार्य अडचणीमुळे विलंब न झाल्यास चालू वर्षांत प्रत्येक महिन्यास एक जोड अंक निघेल.

३. पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावा. बदललेला पत्ता न कळविल्यामुळे कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

४. अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

५. लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादकांकडे करावा.

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां.

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावा. पेन्सिलीने किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवखालीं प्रसिद्धी द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावे.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसे पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

संपादक—**श्रीसाईलीला**

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष [illegible] वें] [illegible] अंक [illegible]



[illegible]दक: — [illegible]

प्रकाशक — [illegible]

श्री साईलीला [illegible] ५ [illegible] रोड, [illegible]

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| महाराजांच्या रथाची मिरवणूक—(छायाचित्र) ... | |
| साईभावप्रदीप—श्री. नी. रा. सहस्रबुद्धे ... ... | ६९९-७२२ |
| शके १८४९ च्या गुरुपौर्णिमेचा हिशोब ... ... | ७२३-७२६ |
| चुकांची दुरुस्ती ... ... ... | ७२७-७२८ |
| महाराज व एकनाथ महाराजांचे ग्रंथ ... ... | ७२९-७३९ |
| ह. भ. प. दासगणू महाराजांचीं पदें ... ... | ७४०-७४९ |
| कविता—श्री. कृ. जा. भीष्म ... ... ... | ७५०-७५२ |
| महाराजांचे अनुभव—श्री. सदाशिव रा. गाळवणकर ... | ६१५ |
| कविता—श्री. वासुदेव एल. गाळवणकर ... ... | ६१६ |
| पत्रव्यवहार—(उपासनीबुवा) ... ... ... | ६१७-६२२ |
| महाराजांचे अनुभव ... ... ... | ६२३ |
| गुरु-प्रसादोद्गार—श्री. रामय्या ... ... ... | ३७-६५ |


## वार्षिक वर्गणी

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरीनें अगाऊ रु. ३।= व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास



शिर्डी येथील महाराजांचा रथ

" इंद्रियाणां निरोधेन सर्वेषां विषयैषिणाम् । मुनेर्जनपदत्यागादध्यात्माग्निः समिध्यते ॥ " ( अ. गी ४२-५२ ) ज्ञानविज्ञानाचा नाश करणाऱ्या इंद्रियाचा प्रथमतः जय करण्याची अर्जुनाला आज्ञा करून तदनंतर **"विविक्तदेशसेवित्वम्"** ( भ गी १३-१० ) ह्या ज्ञानसाधनाचा जो पूर्वी उपदेश केला होता, त्याचाच ह्या श्लोकात अनुवाद आहे अर्थात् हे ज्ञानसाधन लोकसंग्रहास सर्वथा अननुकूल आहे.

" कालचक्र प्रवृत्तिं च निवृत्तिं चैव तत्त्वतः । यस्तु वेद नरो नित्यं न स भूतेषु मुह्यति ॥ " ( अ गी. ४५-११ ) ह्या उक्तीत **" नासतो विद्यते भावः "** ( भ गी. २-१६ ) ह्या वचनात सांगितलेलें जगाचे मिथ्यत्व, **" अव्यक्तादीनिभूतानि "** इत्यादि ( भ गी २-२८ ) श्लोकनिर्दिष्ट ह्या मिथ्या जगताबद्दल अवश्य असलेले ताटस्थ्य, आणि **" भूतानि यांति भूतेज्या "** ( भ. गी ९-२५ ) ह्या श्लोकपादात सांगितलेली लोकसंग्रहासक्तिद्वारा प्राप्त होणारी अधोगति, ह्या तिन्ही मुद्याचा अनुवाद केलेला आहे.

**" लोकसंग्रहधर्मं च नैव कुर्वन्न कारयेत् "** (अ गी. ४६. ३९) या श्लोकार्धांतील ' च ' हें पद उपांत्य असून त्या सर्व श्लोकार्धाचा असा अर्थ आहे कीं, मुमुक्षुत्व प्राप्त होण्याच्या पूर्वी नराधिपाचा जो **लोकसंग्रहरूपी धर्म** असतो, त्याचा त्याने मुमुक्षुत्व प्राप्ति झाल्यानंतर **सर्वस्वी त्याग करावा.** ह्या पूर्वधर्मत्यागाचे कारण ह्यानंतर सांगितलें आहे

**" द्व्यक्षरस्तु भवेन्मृत्यु स्त्र्यक्षरं ब्रह्म शाश्वतम् + ममेति च भवेन्मृत्युर्न ममेति च शाश्वतम् ॥ "** ( अ. गी. ५१-२९ ) ह्या श्लोकांत मायानिर्मित, मिथ्या, जड, आनंदविहीन अशा कोणत्याही द्वैतपूर्ण वस्तूस सच्चिदानंदमय पूर्णाद्वैतात्म्याने **' मम '** म्हणून आपल्या असंगत्वाचा त्याग करणे हाच मृत्यु होय; आणि आत्मेतर वस्तूस " नमम " म्हणणाऱ्या अद्वैत आत्म्यांचे स्वरूप मात्र शाश्वत आहे, असा पूर्णाद्वैत, निर्दोष,

" सर्व " ब्रह्माचा उपदेश केला आहे. **अर्थात् मुमुक्षु सन्यासी असणारच**

( ५ ) **अनुगीता समाप्ति** हा आख्यानरूपी द्वितीय बोध संपल्या-वर भगवान् श्रीकृष्णानीं अर्जुनाला असे बजावून सांगितले कीं,—
" **पूर्वमप्येतदेवोक्तं युद्धकाल उपस्थिते । मया तव महाबाहो तस्मा-दत्त मनः कुरु ॥**" (अ गी ५१-४९) ह्या श्रीकृष्णोक्तींत असे स्पष्ट म्हटले आहे कीं, हे महाबाहो अर्जुना ! पूर्वीं युद्ध करण्याची वेळ जवळ येऊन ठेपली असता मीं तुला अगदीं असाच उपदेश केला होता; ह्यास्तव आता तरी हा नीट ध्यानात ठेव. **अर्थात् भगवद्गीतेचा अनुगीतेशीं विरोधात्मक अस-लेला अर्थ खरा नव्हे, असा प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णाचाच अभि-प्राय आहे;** आणि अनुगीता पूर्णत्वे सन्यासपर आहे, म्हणून खरा भगव-द्गीतार्थहि संन्यासपर असलाच पाहिजे, असें आम्हास वाटते.

"**अहं च प्रीयमाणेन त्वया देवकिनंदन । यदुक्तं तत्करिष्यामि न हि मेऽत्र विचारणा** " ( अ. गी ५२. २१ ) ह्या श्लोकात अर्जुनाने श्रीकृष्णास असे वचन दिले आहे कीं, हे देवकिनंदना ! तूं प्रेमपूर्वक जो मला आतां पुनः उपदेश केला आहेस, तदनुसार मी कांहीं एक विचार न करिता खचित वागेन. ह्या **अर्जनाच्या कबूलीजबाबावरून त्याला लोकसंग्रहाची क्षुद्रता व ज्ञानप्राप्त्यर्थ संन्यासाची अत्यंतावश्यकता, हीं दोन्हीं तत्त्वें पूर्णपणें मान्य झालीं होतीं, असें निःसशय ठरतें.**

येथवर अनुगीतेतील कृष्णार्जुन संवादाचा विचार केला. आतां **निष्कामकर्म** असंभवनीय आहे, असें जें आम्हीं ह्या अनुगीतोक्तीच्या पूर्वीं म्हटलें आहे, त्याचा विचार करूं. आमच्या म्हणण्याला **मनुस्मृतींत** आधार आहे, तो असाः—

**अकामस्य क्रिया काचिद्दृश्यते नेह कर्हिचित् ।**
**यद्यद्धि कुरुते किंचित्तत्तत्कामस्य चेष्टितम् ॥** ( २-४ )

### ( अर्थ–आर्या )

निष्कामकर्म **करणें** संभवनीयचि नसे कदापि जगीं ॥
जे जें कर्म **करी** नर, तत्प्रेरक काम आद्य मनिं राहे ॥

ह्या सिद्धांताला पोषक असलेली प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णाचीहि एक उक्ति आश्वमेधिक पर्व, अध्याय १३, श्लोक ९, ह्यामध्ये आहे, ती अशी:-

" **नेहाकामा काचिदस्ति प्रवृत्तिः ।** "

हे शब्दप्रमाण झालें. आता युक्तीनें काय ठरतें ते पाहूं. "**अप्रियामार्गीं प्रवृत्ति होणार नाहीं ।** " असें एक संतवचन आहे; आणि तें प्रत्येक जिवाच्या स्वानुभवावरूनच सत्य ठरतें. बुद्धीची निजात्म्याविषयीं जशी भावना असेल, तदनुरोधानें आत्मसुखप्राप्त्यर्थ आणि आत्मदुःखनिवारणार्थ प्रत्येक जिवाचें प्रत्येक कर्म घडत असतें, हेंच " **आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति** " ह्या श्री याज्ञवल्क्यांच्या सिद्धांतातील रहस्य आहे आणि अशा प्रकारचा अनुभव असल्याकारणानें मनुष्यप्राणी हा कर्मस्वातंत्र्यामुळें क बाबतींत स्वात्मसुखार्थ प्रायः पश्वादिकापेक्षांहि निसर्गतः अधिक कुमार्गगामी असतो, असें म्हणणें प्राप्त आहे, व हा सर्व खेळ कामाचा म्हणजे वासनेचा आहे अशा दुर्मार्गांपासून मनुष्यास परावृत्त करून सन्मार्गास लावावें, म्हणजे मनातील दुष्ट वासना नाहींशा करून सद्वासनांचा उदय करावा, ह्या एकाच हेतूनें सकल धर्मशास्त्रें म्हणजे आचारनियामक ग्रंथ प्रवृत्त झाले आहेत. असें जरी असलें, तरी सत्कर्मवासना असल्याशिवाय सत्कर्मप्रवृत्ति होणें शक्य नाहीं. म्हणजे अर्थात् कर्म आणि वासना ह्याच्यामध्यें कार्यकारणभाव असावयाचाच. लोकैषणा, पुत्रैषणा, वित्तैषणा दारैषणा इत्यादि कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें मनांत जी वासना असतें, तीच कर्मप्रवृत्तीस कारण होते. जोपर्यंत मन निर्व्यापार झालें नाहीं, तोपर्यंत तें कांहीं ना कांहीं तरी संकल्प करीत असणारच, आणि संकल्पांच्या पोटीं कामही उद्भवणारच. ( भ. गी ६-२४ ); ह्यास्तव कायिक, वाचिक अथवा

मानसिक असलेली प्रत्येक क्रिया काममूलक असावयाचीच परतु मन आत्म-स्वरूपीं लीन होऊन ते निःसंकल्प झाले, म्हणजे मात्र स्थूलसूक्ष्म देहद्वयाचे अखिल व्यापार थांबतात, असा गाढ निद्रेत प्रत्येकाला अनुभव येतो. गाढनिद्रेप्रमाणे देहद्वयाचे सर्व व्यापार थाबून त्या काळीं त्या स्थितीची जाणीव असणे, ह्यालाच समाधि म्हणतात. परंतु ती पूर्ण योग्याना मात्र ठाऊक असणार स्वस्थ ( आत्मस्थ ) राहून निर्व्यापार होण्यात अर्थ नाहीं, असे म्हणणे हे " **द्राक्षे आंबट** " म्हणण्यासारखेच आहे श्रद्धाहीन क्षुद्र जीवाना योग्याच्या नैष्कर्म्यसिद्धीची नुसती कल्पनाहि होत नसल्यामुळे त्यानीं असंभवनीय **निष्काम--कर्माचें** वृथा बंड माजविले आहे

आता आणखी एका प्रश्नाचा विचार करून मग कर्माकर्मविकर्म म्हणजे काय ते पाहूं जयद्रथवध प्रतिज्ञेसंबंधीं कृष्णार्जुनाचा जो संवाद झाला त्यावरून अर्जुनाचा जो आत्यंतिक स्वाभिमान व्यक्त होतो, तो मनात आणला म्हणजे युद्धत्यागप्रवृत्त झालेला अर्जुन नुसत्या शाब्दिक उपदेशाने युद्धप्रवृत्त झाला, हे म्हणणे मूढपणाचे ठरते भीष्मद्रोणादिकांच्या युद्धमूलक मृत्यूच्या भीतीने तो युद्धत्यागास प्रवृत्त झाला होता, आणि आपण युद्धत्याग केला तरी ते खास मरणारच अशी त्याची विश्वरूपदर्शनाने पक्की खात्री झाली, म्हणूनच ता आपला महदभिमानमूलक दुराग्रह सोडून युद्धास प्रवृत्त झाला, असें धृतराष्ट्राचे जे म्हणणे संजयाने मान्य केले, तेच सत्य आहे ती धृतराष्ट्रोक्ति अशी आहे:—

**" यदाऽश्रौषं कश्मलेनाभिपन्ने रथोपस्थे सीदमानेऽर्जुनेवै ।**
**कृष्णं लोकान्दर्शयानं शरीरे तदा नाशंसे विजयाय संजय ॥ "**

( आदि १--१८१ )

म्हणजे अर्जुन हा मोहाने व्याप्त होऊन शस्त्रास्त्रे खालीं ठेवून निरुत्साह होत्साता रथात बसला असतां भगवान् श्रीकृष्णाने आपले विराटस्वरूप दाखवून त्याला वीरश्री उत्पन्न केली, असें जेव्हां मला समजले, तेव्हाच पाडव

खचित् विजयी होणार असा मी निश्चय केला, असे धृतराष्ट्राचे म्हणणे संजयाने कबूल केले असो. अर्जुनाच्या अपरिहार्य प्रारब्धकर्मत्यागबुद्धीच्या निरसनार्थ वस्तुतः त्या कर्माच्या अपरिहार्यत्वामुळेच कोणत्याहि उपदेशाची आवश्यकता नव्हती, हे योगेश्वर भगवान् श्रीकृष्ण पूर्णपणे जाणून होते; व सुंठेवाचून जाणाऱ्या खोकल्यास कोणता वैद्य सुंठीचा उपचार करील? परंतु अर्जुनाच्या सख्य भक्तीस वश होऊन त्याचे लाड पुरविण्यासाठीं श्रीकृष्णानीं त्याला सकल अध्यात्मशास्त्राचा उपदेश करून तद्वारां आपले धर्मसंस्थापनेचे कार्यही उरकून घेतले हेच खरे. शिवाय महाभारताच्या हरिवंश पर्वांत अशी हकीकत आहे कीं, देवेंद्राने अर्जुनरूपाने अंशावतार घेण्याचे आदि नारायणापाशीं जेव्हा कबूल केले, तेव्हाच त्याने अर्जुनाला **अध्यात्मोपदेश** करण्याची त्या देवाधिदेवाला प्रार्थना केली असल्यामुळे, त्या वेळीं इंद्राला दिलेल्या वचनाच्या परिपालनाची योग्य वेळ आल्याबरोबर ते स्वीकृत कार्य श्रीकृष्णरूपी नारायणाने करून टाकले. असो. आतां कर्माकर्मविकर्माचा विचार करूं.

**"ॐ नमो ब्रह्मणे नमोऽस्त्वग्नये नमः पृथिव्यै नमः ओषधीभ्यः।**
**नमो वाचे नमो वाचस्पतये नमो विष्णवे महते करोमि ॥"**

ह्या वैदिक नमनामध्ये द्वैतकल्पनामूलक विश्वोत्पत्यादि विश्वसंहारान्त परमेश्वराच्या कार्याची परंपरा सांगितली असून प्रथमतः औषधिरूपानें व्यक्त होणाऱ्या जिवाची विष्णु संज्ञक परब्रह्मापर्यंत उत्क्रांति होऊन शेवटीं तो आपल्या आदिकारणांत स्वतःच्या इच्छाशक्तीनें लीन होतो, असे दर्शविलें आहे. अशा प्रकारे अवक्रांतिपूर्वक उत्क्रांत्याभास होणे, हा जो जीवब्रह्माचा **"स्वभाव"** आहे यालाच **"अध्यात्म"** म्हणतात ( भ. गी. ८-३ ) सच्चिदानंदमय परब्रह्मापासून च्युत झालेल्या जीवाला आपण स्वतः सदासर्वदा सुखोपभोगांत असावे अशी जी अखंड वासना असते, तिचें कारण तो सच्चिदानंदपदाचा हक्कदार वारस आहे, हेच होय. तसें नसेल तर त्या सर्व-

श्रेष्टपदप्राप्तीची वासना प्रत्येक जीवास कशी होईल? राजाच्या पोटीं जन्म मिळाल्याशिवाय राजपदप्राप्तीची इच्छा होत नाहीं, असे असून राजाच्या ऐश्वर्यापेक्षा अनंत पटीनें श्रेष्ट असलेल्या सच्चिदानंदपदाची जी प्रत्येक जिवाला इच्छा होते, तिचें बीज त्याच्या त्या पदाच्या हक्कदारीशिवाय अन्य काय असणार? परंतु मायेच्या तडाक्यांत सापडल्यामुळे आपल्या आद्य पदाचा विसर पडतो, त्याचेंच नांव **अज्ञान** ही जीवाची प्रथमावस्था होय. ह्याच्या पुढच्या द्वितीय अवस्थेस **आवरण** अशी संज्ञा आहे, आणि अज्ञात असलेले सच्चिदानंदमय निजपद मुळींच नाहीं, अशी बुद्धीची भावना होणे, हेंच त्या अज्ञानावरणाचें कार्य आहे ह्याच्या पुढील तृतीयावस्थेस **विक्षेप** असें नाव असून त्या अवस्थेतील पूर्ण इंद्रियाधीनतेनें इंद्रियगोचर होणाऱ्या वस्तूविरहित सत्य अशी अन्य वस्तु नाहीं, असा बुद्धिनिश्चय होणे, हे त्या विक्षेपाचें कार्य आहे ह्या इंद्रियाधीनतेच्या पुढे प्रायः कोणीच मनुष्य जात नाहीं; आणि ही मायाजन्य इंद्रियाधीनतारूपी परवशताच सकल वासना-मूलक असलेल्या दुःखदायक कर्माची जननी आहे ( भ गी. ३--४१ ). ह्या परवशतेचा प्रभाव एका संतवचनात

**" आधीं सुखरूपचि होता । कांहींच हृद्रोग नव्हता ॥**
**राजश्रियेतें नयनीं देखतां । धरिली हृदयीं कामना ॥ "**

असा वर्णन केला आहे; आणि जिवाचा निजात्मस्वरूपीं लय होई तोंपर्यंत दुरत्यया मायेच्या ह्या नातीची गति अकुंठित राहून तिच्यामुळेच जीवदेहो-त्क्रांति सतत सुरू असत हें तत्त्व ज्या एका श्लोकांत सागितले आहे,तो श्लोक असा आहे:—

**" निःस्वो वष्टि शतं शती दशशतं लक्षं सहस्राधिपः ।**
**लक्षेशः क्षितिपालतां क्षितिपतिश्चक्रेशतां वांच्छति ॥**
**चक्रेशः पुनरिंद्रतां सुरपतिर्ब्राह्मं पदं वांच्छति ।**
**ब्रह्मा शैवं पदं शिवो हरि पदं आशावधिं कोगतः ॥**

## ( अर्थ-आर्या )

शतरूपक इच्छी तो, जो लोकीं वसतसे अकिंचनसा।
दशशत इच्छी शतपति, दशशतपति इच्छितोचि लक्षातें ॥ १ ॥
लक्षेशा भूपतिता, भूपतिसी सार्वभौमता लागे।
सुरपति व्हावें ऐशी, दृढ इच्छा धरित सार्मभौमहि तो ॥ २ ॥
सुरपतिसहि सोडीना, ब्रह्मपदेच्छा, शिवत्व ब्रह्यातें।
लागतसे, शिव मार्गे, हरिपद आशा न सोडि कवणातें ॥ ३ ॥

अशा प्रकारें आधतीं अव्यक्त ( अदृश्य ) असलेल्या नश्वर जड सुखसाधनप्राप्तीची वासना सतत वाढत जाऊन तदनुरोधानें घडणारें अहं-भावमूलक कर्म फलद्रूप झाले म्हणजे तेंच पुनर्जन्मांतरास कारण होतें, आणि जन्मामागे मरण हे ठेवलेलेंच असल्यामुळें जीवाची जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका होणे दुरापास्त होऊन जाते. अशा प्रकारें अनंत जन्म-जन्मातरीं केलेल्या सकल कर्मांपैकीं जीं कर्मे प्रस्तुत जन्मापूर्वी प्रारब्धरूपानें अवश्य फलभोगार्थ उद्युक्त झालेलीं असतात त्या सकल प्रारब्धकर्मांशिवाय जीं फलभोगार्थ शिल्लक राहिलेलीं असतात, त्या सर्वांच्या समूहास "**संचित**" असें नाव असून, प्रस्तुत देहावरोबर जो संचितांश अवश्य फलभोगार्थ निर्माण झालेला असतो, त्याला "**देहप्रारब्ध**" म्हणतात. ह्या "**देहप्रारब्ध**" शब्दावरूनच प्रारब्धाचा आत्म्याशीं कांहीं एक संबंध नसून जीव हवी तितकी आत्मोन्नति करून घेण्यास समर्थ आहे, असा अर्थ होतो. जिवाच्या आधिभौतिक नश्वर देहास अवश्यत्वें प्राप्त होणारीं सुख-दुःखें निर्माण करणें, एवढेंच प्रारब्धाचे कार्य आहे; आणि देहदुःखनिवार-णार्थ तत्कारणाचा प्रतिकार करण्याची प्रत्येक जीवाची सतत खटपट चालू असताहि देहदुःखे जशीं अवश्य प्राप्त होतात, त्याचप्रमाणें कांहीं एक खटपट न केली तरी देहास प्राप्त होणारीं सकल सौख्येंहि अवश्यत्वेंच उत्पन्न होतात. हे तत्त्व जाणूनच "**अन्न आच्छादन हें तों प्रारब्धा आधीन**" असें

श्री तुकोबानीं म्हटले आहे; आणि त्याच्याहि पलीकडे दृष्टि देऊन "**दाने दानेपर लिखा है खानेवालेका नाम**" असे श्री कबीरानीं म्हटले आहे ह्या **देहप्रारब्धाचे** तीन प्रकार आहेत, आणि त्यानाच "**तापत्रय**" अशी अन्य संज्ञा आहे त्यापैकीं "**स्वेच्छाप्रारब्ध**" ( अध्यात्मिकताप ) हा पहिला प्रकार होय हे **अपरिहार्य** असते; आणि ह्याच्याच बलानें श्रीसीतादेवीला श्रीरामचंद्रास सकलदुःखमूलक असलेल्या असभाव्य मायिक सुवर्णमृगाच्या पाठीमागे पाठवून देण्याची बुद्धि झाली ! परिणामीं निश्चितत्वें दुःखदायक असलेल्या राजपत्निगमनादि दुष्कर्मांची प्रवृत्ति ह्याच्याच बलानें होने "**परेच्छा प्रारब्ध**" ) आधिभौतिक ताप ) हा दुसरा प्रकार असून "**अनिच्छा प्रारब्ध**" ( आधिदैविक ताप ) तिसऱ्या प्रकाराचे नाव आहे. त्रिकाल ज्ञानदायक असलेल्या शास्त्रोक्त तपदिकाच्याद्वारे योग्याना ह्या दोन प्रकारच्या प्रारब्ध तापांचे निवारण करिता येत असून "**अहं-ब्रह्मास्मि**" अशा ज्ञानाने "**नाहं देहः**" ही भावना दृढ झाली, म्हणजे अनतपूर्व जन्मारंभापासून ज्ञानप्रातिद्वारे मिथ्या ठरलेल्या प्रस्तुत देहाच्या अतापर्यंत केवळ देहद्वारे घडलेल्या व घडणाऱ्या संचित प्रारब्ध आणि क्रियमाण नामक सकल कर्मांना साद्यंत मिथ्यात्व प्राप्त होत असल्यामुळे त्याच्या बंधापासून आत्मा विमुक्त होतो "**सर्वं कर्माखिलं पार्थज्ञाने परि-समाप्यते**" ( भ. गी. ४-३३ ) ह्या भगवदुक्तीचा हाच अर्थ आहे; आणि प्रारब्धाधीन असलेल्या देहापासून स्वतःला पूर्णत्वे भिन्न समजणाऱ्या ज्ञानविज्ञानतृप्तात्म्याला अज्ञानी जन देहात्मसमुच्चय रूपानेच ओळखीत असल्यामुळे केवळ त्याच्या समजुतीसाठीं ज्ञानी पुरुषालाहि प्रारब्ध चुकत नाहीं अशा अर्थाचे "**प्रारब्ध कर्मणां भोगादेव क्षयः**" हे वाक्य प्रवृत्त झाले आहे वास्तविक पाहता चैतन्यरहित असलेल्या केवल पंच-भूतात्मक स्थूल-सूक्ष्म नामक देहद्वयास सुखदुःखाभास होणे शक्य नाहीं. सुखदुःखाभास होणे हा जरी मनाचा धर्म असला, तरी त . त्याला आत्म-प्र काशाच्या साहाय्यावांचून होत नाहीं, कारण ते स्वतः चिन्मय नसून फक्त

चिद्ग्राहक आहे, आणि असाच अनुभव प्रत्येक अयोगयुक्त जीवाला गाढ निद्रेत येत असतो " **संचित** " आणि " **प्रारब्ध** " नामक द्विविध कर्म ह्यांचा येथवर विचार झाला. आता " **क्रियमाण** " कर्माचा विचार करूं.

ह्या क्रियमाण कर्मांत प्रारब्ध कर्मानंतर असलेल्या सकल प्रस्तुत देहद्वय-निर्मित क्रियांचा ( चेष्टांचा ) समावेश होत असून ह्या क्रियांचे कर्म ( न्याय्य ), विकर्म ( विपरीत ), आणि अकर्म ( विपरीत ) असे तीन पोट-भेद आहेत ( भ गी ४-१७) कर्म म्हणजे "**कार्यकर्म**" (भ. गी ३-१९) असा अर्थ असून, " **कार्यकर्म** " ह्याचा " **नियतकर्म** " ( भ. गी ३-८ ) असा अर्थ आहे आणि " **नियतकर्म** " म्हणजे मनुस्मृतिप्रणीत **विधेय कर्म** ( भ गी ४-१ व १६-२४ ) होय त्याचप्रमाणे **अकार्य कर्मांचा** निर्णयहि मनुस्मृत्यान्वयेच केला पाहिजे. ( भ. गी. ४--१ व १६-२४ ) ह्या अकार्य कर्मालाच **विकर्म** म्हटलें असून **अकर्म** ह्याचा अर्थ नियत-कर्मत्याग असा आहे. सकल **स्वभावज** म्हणजे **प्रकृतिनिर्मित** आनुवंशिक संस्कारजन्य कर्मांचा ( अपरिहार्य प्रारब्धकर्माचा ) " **नियत-कर्मांत** "**च** अंतर्भाव होतो ( भ. गी. १८-४० ते ४४ ); आणि सर्वच **कर्मे** स्वभावतःच जडात्मक असल्याकारणाने त्याच्या फलांमध्ये जो तरतमभाव उत्पन्न झालेला दिसतो, त्याचें कारण केवल कर्त्याची बुद्धीच असल्यामुळे कोणतेहि **कर्म** अहंकर्तृत्वभाव सोडून फलासह ईश्वरार्पण बुद्धीनें केल्यास ते चित्तशुद्धिद्वारा अंतीं मोक्षदायकच होत असून ( भ. गी. १८—४५ व ४६ ) **अकर्में** व **विकर्में** हीं अहंकर्तृत्वभावविरहित होणें अशक्य असल्यामुळें तीं सारीं सर्वस्वीं बधक होतात, असा भगवद्गीतेचा सिद्धांत आहे ( भ. गी. ३--९ ). अर्थात् अपरिहार्य **प्रारब्ध** कर्माचा पूर्ण क्षय त्याच्या अवश्य घडणाऱ्या भोगानें होऊन तद्द्वारां **संचित** कर्माचाहि सहजच अंशतः क्षय होतो; आणि **अकर्म** व **विकर्म** ह्यांच्या त्यागपूर्वक शास्त्रनियत ( भ. गी. १६--२४ ) कर्म करीत राहिल्यानें सहजच ईश्वरप्रसादद्वारा

चित्ताची शुद्धी होऊन ते प्रथमतः ज्ञानग्रहणास योग्य होतें, व शेवटीं ज्ञानप्राप्ति झाली म्हणजे आत्मस्वरूपीं लीन होते, म्हणजेच मुक्त होते.

" **मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः** " ( आत्मबिन्दु उपनिषत् ) ह्या श्रुतीचा असाच अर्थ आहे. ह्याप्रमाणे **कर्माकर्मविकर्मांचा** पूर्ण विचार करून आणि " **अहं क्रतुरहं यज्ञ** " ( भ गी ९--१६ ) "**भोक्तारं यज्ञतपसां मां**" ( भ गी ५--२९ ) " **अहं हि सर्व यज्ञानां भोक्ताच प्रभुरेव च**" (भ गी ९-२४), "**अधियज्ञोऽहं**" (भ. गी ८-४), " **यज्ञानां जपयज्ञोस्मि** " ( भ गी. १०-२५ ), "**अफलाकांक्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो**" ( भ गी. १७-११ ), " **ॐ तत्सदिति निर्देशा** " इत्यादि " **कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते** " इत्यंत ( भ. गी १७--२३ ते २७ ) ह्या सकल भगवदुक्ति पूर्णपणे ध्यानांत ठेवून "**यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र**" इत्यादि "**अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ सजीवति**" इत्यंत (भ. गी. ३ -९ ते १६ ) ह्या श्लोकाष्टकातील भगवदुक्तींचा प्रामाणिकपणानें विचार केला, तर भगवद्गीतोक्त अखिल कर्मयोगात अपरिहार्य प्रारब्धकर्म त्यागबुद्धि सोडून केलेल्या केवल मनुस्मृत्योक्त शुद्ध वैदिक यज्ञदानतपाहारादि विहित कर्मांशिवाय इतर कोणत्याहि कर्माचा समावेश होत नाहीं, असे कबूल करणे भाग आहे. हाच खरा चित्तशुद्धिकारक आणि शुद्ध भक्त्युपादनरूपी सिद्धिदायक कर्मयोग असून पूर्ण वैराग्यमूलक ( भ. गी २-४५ ) शुद्ध व्यवसायात्मिका बुद्धि प्राप्त होण्यास त्याच्याशिवाय अन्य उपाय नाहीं.

परंतु हे कर्मयोगरहस्य न समजल्यामुळें किंवा समजूनउमजून श्रद्धाहीनतेस्तव त्याचा त्याग करण्याच्या बलवत्तर प्रवृत्तीमुळें **विक्षेप** नामक तृतीय अवस्थेच्या पलीकडे जाण्याची प्रायः कोणासच इच्छा होत नसून हे सर्व जग शुद्ध अधोगामी (गीता १८-४८) आधिभौतिक प्रवृत्तिमार्गांतच धन्यता मानीत असून "**सर्वारंभपरित्यागी**" (भ. गी. १२-१६, व १४-२६) होण्याचा सर्वांनाच कटाळा आहे; व तेणेकरून "**मम माया दुरत्यया**"

(भ. गी. ७-१४) ह्या भगवदुक्तीची सिद्धता होत आहे. अशा स्थितींत दैववशात् एखाद्या भाग्यवान पुरुषास ह्या मायाजालातून सुटण्याची जर तीव्र इच्छा झाली, तर तो भक्तिमार्गाचा अवलंब करितो, आणि मग त्या मार्गांत त्याची प्रगति सतत चालू राहून शेवटीं तो सद्गुरुकृपाद्वारें जी **चतुर्थावस्था** प्राप्त करून घेतो तिला **"परोक्षज्ञान"** अशी सज्ञा आहे. ह्या परोक्षज्ञानानें पूर्वींच्या तिन्ही अवस्थांचा म्हणजे (१) ब्रह्म भासत नाहीं, (२) वास्तव तें नाहीं, आणि (३) प्रत्यक्षत्वास्तव जग सत्य आहे ह्या **अज्ञान, आवरण** व **विक्षेप** रूपी बुद्धीचा नाश होऊन गुरुप्रतीति आणि शास्त्रप्रतीति ह्या प्रमाणद्वयावरील श्रद्धेच्या योगानें **"सर्वं खल्विदं ब्रह्म"** असा बुद्धिनिश्चय होतो. मग तो निश्चय निर्गुण ब्रह्माविषयीं असो अथवा सगुण परमेश्वराविषयीं असो. कारण **"सगुण निर्गुण एक गोविंदु रे ॥"** ह्या संतानुभवाप्रमाणें सगुणरूप निर्गुणाहून भिन्न नाहीं. **योग** नामक जी पूर्व अवस्था ती हीच होय, आणि हिच्या द्वारेंच एकात्मतारूपी अद्वैत उत्तरावस्थेचा लाभ होतो. दासबोधांतील भ्रमनिरूपणारंभीं समर्थांनीं सांगितलेल्या **" भ्रमेणाहं भ्रमेणत्वं भ्रमेणोपासका जनाः ॥ भ्रमेणेश्वरभावत्वं भ्रममूलमिदं जगत् ॥"** ह्या पूर्णाद्वैत सिद्धांताप्रमाणें मी, तूं, उपासक भक्त, उपास्य ईश्वर, इत्यादि जगासह सकल द्वैतमूलक भावना जरी मिथ्या भ्रमरूप असल्या तरी अव्यक्त, अक्षर, परमगतिरूप ब्रह्मच त्या भ्रमाचें विवर्तोपादान कारण असल्यामुळें तो संवादिभ्रम ठरून तद्द्वारां ब्रह्मपदप्राप्ति झालीच पाहिजे. निश्चित ज्ञानाभावीं जरी भ्रामक कल्पनेनें हिरा समजून हिरा घेतला, तरी खऱ्या हिऱ्याचीच प्राप्ति होणार, आणि कांचेवर हिऱ्याची भ्रामक कल्पना होऊन जर ती घेतली, तर कांचच मिळणार. ह्यातील पहिला संवादिभ्रम आहे व दुसरा विसंवादिभ्रम आहे. अशा संवादिभ्रमानें कामातुर गोपी श्रीकृष्णपदीं लीन झाल्यामुळें त्यांना तद्द्वारा जसा मुक्तिलाभच झाला, तद्वत् वस्तुतः अद्वैतब्रह्मरूपी असलेल्या परमेश्वराची जरी द्वैतभावनेनें उपासना केली, तरी शेवटीं अद्वैत ब्रह्मज्ञानाची प्राप्ति झालीच पाहिजे. ह्या ब्रह्मात्मैक्य ज्ञानासच **"अपरोक्ष ज्ञान"** म्हणतात. हीच

जिवाची **पांचवी** अवस्था आहे. ह्याच्या पुढील **सहावी** जी अवस्था आहे तिला **"आत्यंतिक दुःखनिवृत्ति"** असे नाव आहे, आणि तिचा अनुभव अंशतः प्रत्येक जीवाला गाढ निद्रेत नित्यशः येत असतो. तीच परमानंदरूप आहे, परंतु **"मारवाडांत गेल्याशिवाय पाण्याचें सुख कळत नाहीं"** ह्या म्हणीप्रमाणे निद्रा नष्ट झाल्याशिवाय निद्रानंदाची खरी किंमत कळत नाहीं. ज्या वैषयिक अल्प सुखासाठीं सकल जीवाची अव्याहत खटपट चाललेली असते त्याच्या अभावीं वर्षेंच्या वर्षे जात असतात; परंतु निद्रानंद पूर्णत्वे नष्ट झाल्यास जीव देण्याचीच पाळी येते. ह्यापुढील जिवाच्या शेवटल्या **सातव्या** अवस्थेस **"निरंकुशातृप्ति"** अशी संज्ञा आहे; व हीच भगवद्गीतेच्या द्वितीयाध्यायातीं वर्णिलेली **ब्राह्मीस्थिति** होय. श्वेतवर्ण, आर्द्रता आणि माधुर्य हे तीन धर्म दुधात जसे एकरूपानें असतात, तशीच ह्या स्थितींतील सच्चिदानंदता एकरूपी असते. जिवाची आद्य अवस्था-त्रयातून सुटका होण्यास प्रस्तुत सूत्रोक्त **"परम प्रेमरूपा भक्ति"**च कारण होते. ह्या परमप्रेमाची अशी मौज आहे कीं, तें एकदा ज्या वस्तूवर जडते, त्या वस्तूचा मनास निदिध्यास लागलेला असूनहि त्याचें आपल्याला भान सुद्धा रहात नसतें. ह्याचें कारण असें आहे कीं, मन तन्मय झालेले असते. ही स्थिति लक्षांत येण्यासाठीं हंसस्वरूप स्वामींनीं आपल्या एका व्याख्यानात जी गोष्ट सागितली होती, ती आतां सागतो. एका गृहस्थाजवळ त्याच्या प्रेमातिशयास पात्र झालेली एक अतिसुंदर हिऱ्याची आगठी होती. ती त्याने सर्वतोपरी अति सुरक्षित असलेल्या स्थळीं ठेविली असून सणावाराच्या दिवशीं मात्र तो ती बाहेर काढीत असे. अर्थात् मध्यंतरीं आपल्याला तिचें सतत स्मरण होत आहे, ही कल्पना त्याच्या गावींहि नव्हती. परंतु एकदा तो आपल्या घरापासून बऱ्याच लाबीच्या पल्ल्यावर असताना आपल्या घरास आग लागली, अशी बातमी त्याच्या कानीं आकस्मिक पडताच "आता आपल्या आगठीचे काय होईल" अशी कल्पना प्रथमतः त्याच्या मनात आली. सर्वप्रिय माणसांना सुद्धां मागें सारून ती आंगठीच प्रथमतः दत्त म्हणून त्याच्यापुढें एकदम आकस्मिक येऊन उभी

राहण्याचें कारण त्याच्या मनांतील तिच्या निःसीम प्रेममूलक अखंड चिंतनाशिवाय अन्य काय असणार ? असे भगवंताविषयीं निःसीम प्रेम असणें, ह्यालाच **व्यवसायात्मका बुद्धि** म्हणतात. आणि ते एकदा उत्पन्न झालें म्हणजे भृंग-कीटक न्यायाने अखेरीस परमेश्वरकार झालेच पाहिजे. हाच मोक्ष होय, असे जाणून "**देवापाशीं नाहीं मोक्षाचें गाठोडें**" असे सांगणाऱ्या परमेश्वरमय झालेल्या श्री तुकाराम महाराजांनी "नलगे मुक्ति" ह्या उक्तीनें मुक्ताना मुक्तीची किंमत नसते, असें दर्शविलें आहे. वरील आंगठीच्या गोष्टीप्रमाणें परमेश्वरावर निःसीम प्रेम जडलेल्या पुरुषास भगवंताचें नकळतहि अखड स्मरण होत असल्याकारणानें त्याला देहत्यागकालींहि ईश्वरस्मरण होऊन तो तदनंतर ईश्वरस्वरूपींच लीन होणार असा गीतेतील सत्कर्म योगजन्य भक्तियोगाचा प्रभाव आहे. परंतु "**न मिळो खावया न वाढो संतान। परि हा नारायण कृपा करो**" अशा तीव्र वैराग्याची भक्तीला जर जोड नसेल, तर ती "**अस्मिन्परम प्रेमरूपा**" म्हणता येणार नाहीं, आणि तशी झाली नाहीं तोपर्यंत ती साक्षान्मुक्तिदायकहि होणार नाहीं. "**परमप्रेमरूपा**" भक्त्युत्पत्तीच्या द्वारे "**व्यवसायात्मिका**" बुद्धि झाली, म्हणजे परमेश्वरार्पणास योग्य नसलेले कोणतेंहि कर्म, बुद्धिपूर्वक होणें शक्य नसल्यामुळें पुरुषकर्मातीत होतो, हें जाणून श्री तुकाराम बावा म्हणतात "**विधि-निषेधाचे गोवे॥ अवघे गुंडाळुनि ठेवावे**" आणि प्रल्हाद, भरत, व्रजगोपिका, इत्यादिकांनी शास्त्राज्ञा बाजूला ठेवून "**जेणें जोडे नारायण॥ तेंचि सुकर्म जाण, जरी हीनाहुनी हीन॥ तरी तेंहि विशुद्ध॥** ह्या वचनाची सत्यता प्रस्थापित केली आहे. "**नारायणी घडे जेणें अंतराय। हो कां बापमाय त्यजावी ते.**" ह्या श्री तुकारामांच्या उक्तीनेंहि प्रल्हाद व भरत ह्यांच्या शास्त्रविरुद्ध आचरणाचे मंडनच केलेलें आहे. परंतु हा न्याय सामान्य लोकाना लागू नाहीं. ज्यांनीं परमेश्वरस्वरूप ओळखिलें, अशा भाग्यवान पुरुषांचच तो अधिकार आहे. हें कर्मरहस्य अनधिकारी लोकांना बजावून सांगण्यासाठीं श्रीतुकाराम महाराज म्हणतातः—

"संतसंगती न करावा वास। एखादे गुणदोष अंगीं येती ॥ १ ॥
मग तया दोषां नाहीं परिहार। होय अपहार सुकृताचा ॥ २ ॥
तुका म्हणे नमस्कारावे दुरून। अंतरीं धरून राहे रूप ॥ ३ ॥

"न देव चरितं चरेत्" ह्या वचनांतील तात्पर्यहि तेंच आहे. भिन्न संतांची भिन्न स्वरूपें असतात, तीं कधीं कधीं "बालोन्मत्त पिशाचवत्" अशीं असतात; कारण "विविक्त देशसेवित्वं अरतिर्जन संसदि" ह्या ज्ञान चिन्हांच्या परिपालनार्थ तसे राहणें त्याना अधिक सोयीचे असते. म्हणून खऱ्या संताची परीक्षा होणे फार दुर्घट असल्याकारणानें "इदं च नास्ति परं च न लभ्यते" अशी दुर्गति टाळण्याकरितां दीर्घकाल सहवास करून पूर्ण दृढ वैराग्याविषयीं बालंबाल खात्री झाल्याशिवाय साधकानीं कोणासच शरण न जातां स्वतःच्या सामर्थ्याने शक्य तितका आत्मोन्नतीचा मार्ग आक्रमण करीत गेल्यास योग्य कालीं योग्य गुरूच योग्य साधकाला भेट देऊन आपल्या अधिकाराविषयीं त्याची खात्री पटवून देऊन त्याला पुढील मार्गास लावितो. हें आमचे मत नव्हे. "ऐशीं कर्में साम्यदशा ॥ होय तेथ वीरेशा ॥ मग श्रीगुरु आपैसा ॥ भेटेचिगा ॥ ( भा. दी. १८-९६६ ) असे ज्ञानेश्वर म्हणतात. सत्पुरुषांच्या कृपेने "गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु च्छिन्न संशयाः" असे प्रकारहि कधीं कधीं घडतात, कारण "याची परी पाहतां ॥ जीव अविद्या विरहिता ॥ काम्य कर्मातीता ॥ जाणिजे ऐसा ॥" ह्या श्री मुकुंदराजप्रणीत सत्पुरुषांच्या व्याख्येप्रमाणें सत्पुरुष आहेत, अशी प्रत्यक्ष पक्की खात्री झाली म्हणजे कांहीं विचारपूर्ण साधकांना अधिक काहींच नको असते. ते चमत्कारांना भुलणारे नसतात. कारण चमत्कार करण्याचे सामर्थ्य ज्या सिद्धींच्या द्वारें प्राप्त होत असते, त्या साऱ्या सकार्य प्राकृता म्हणजे शुद्ध क्षरभाव आधिभौतिकच असतात. असो. भक्तीच्या व्याख्येंत भक्तिदायक कर्मांचा आणि भक्तीच्या फलांचा सांगोपांग

विचार करणे अवश्य असल्यामुळें हें द्वितीय सूत्रार्थाचें विवरण इतकें सहजच लावलें. आता तृतीय सूत्रास आरंभ करूं. अठ्ठेचाळिसाव्या सूत्राच्या विवरणांत प्रथमतःच पुनरुक्तीबद्दल जे चार शब्द लिहिले आहेत, ते ध्यानांत ठेवणें अवश्य आहे.

## सूत्र ३.

॥ अमृतस्वरूपाच ॥

आर्या

आत्मस्वरूप साई, भक्ति तयाची कशी अमर नोहे ।
जरि ती असली भ्रामक, तरि तो भ्रमही असेचि संवादी ॥

**विवरण**—मागील सूत्रात व्यवसायात्मिका ( केवल जीवेशैक्यनिष्ठ ) बुद्धि असणे, असे भक्तीचे जे लक्षण सांगितले, त्याची ह्या सूत्रानें पूर्णता करून जीवेशैक्यनिष्ठ, म्हणजे अर्थात् अशी निष्ठा असलेला पुरुष अमर असतो असें सांगितलें आहे; आणि मागील सूत्राच्या विवरणात संवादिभ्रमाचें जें सोदाहरण लक्षण सांगितले आहे, तदन्वयें भक्तियोगी पुरुष अमर असणें अवश्यच आहे. शिवाय " न मे भक्तः प्रणश्यति " ( भ. गी. ९–३१ ) असें भगवद्वाक्य असून " पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते " ( भ गी. ६–४० ते ४५ ) इत्यादि श्लोक षट्कात भक्तियोगी पुरुष अमर कसा होतो, त्याचें सविस्तर वर्णनहि केलेले आहे. भक्तियोगाचा असा अजब महिमा असल्यामुळेंच मुक्तीच्या म्हणजे ज्ञानप्राप्तीच्या द्विविध साधनांत भक्तीलाच श्रेष्ठत्व दिलें आहे. समर्थ श्री रामदास स्वामींनीं मनास बोध करण्यास सुरवात केल्यावरोबर प्रथमतःच " **मना सज्जना भक्ति पंथेंचि जावें । तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावें ॥** " असें म्हटले असून त्या वचनांतील " **स्वभावें** " ह्या शब्दानें स्वभक्तास आत्मसात् करून घेणें, हा श्रीहरीचा स्वभावच आहे, असें दर्शविलें आहे. "**नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ । मद्भक्ता**

यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद ॥ " ह्या उक्तीने स्वतः श्रीहरीने अ पल्या वरील समर्थोक्तीने वर्णिलेला स्वभाव व्यक्त केला आहे भगवद्गीतेत "महात्मा" हा शब्द भगवताप्रमाणे फक्त ज्ञानी भक्तानाच उद्देशून आला असल्यामुळे भक्तेतराना महात्मा म्हणणे अयोग्य ठरतें. शिवाय भगवान् श्रीकृष्ण सकल स्वभक्ताना मात्र उदार कां म्हणतात ( भ गी ७-१६ ) ह्याचा विचार केला तर परमेश्वरस्वरूपाची सर्वश्रेष्ठ देणगी भक्ताशिवाय इतराकडून मिळणे शक्य नाहीं, ह्यास्तव भक्त हेच काय ते भगवताला उदार वाटतात, असे म्हणणे प्राप्त आहे आणि ह्याच कारणास्तव " भाग्यवंत म्हणो तया । शरण गेले पंढरिराया ॥ " ह्या उक्तीनें संतश्रेष्ठ तुकाराम फक्त भक्ताना मात्र भाग्यवान् म्हणत आहेत. अर्थात् सकल अभक्त आणि दांभिक भक्त करटेच होत. " वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यः " ( भ गी १५-१५ ) ह्या भगवदुक्तीप्रमाणे स्वतः सकल वेदच भगवद्गुणगायक ह्या नात्याने मूर्तिमंत भक्तश्रेष्ठ ठरतात; आणि ह्याच कारणास्तव " भारतः पंचमोवेदः " ह्या वाक्यानुसार पंचम वेदरूप असलेल्या महाभारतातील गजेंद्रमोक्षस्थ असलेल्या

> " गीता सहस्रनामैव स्तवराजो ह्यनुः स्मृतिः ।
> गजेंद्रमोक्षणं चैव पंचरत्नानि भारते " ॥

ह्या अंत्य श्लोकात ( १ ) श्रीमद्भगवद्गीता, ( २ ) विष्णुसहस्रनाम, ( ३ ) भीष्मस्तवराज, ( ४ ) अनुस्मृति, आणि ( ५ ) गजेंद्रमोक्ष ह्या शुद्ध भक्तिमय असलेल्या पाच प्रकरणाना मात्र "रत्ने" हीं संज्ञा दिली असून त्य पंचरत्नातील आद्य ( श्रेष्ठ ) स्थान श्रीमद्भगवद्गीतेस देऊन तिची सर्वश्रेष्ठ भक्तिप्रधानता व्यक्त केली आहे. भक्तीला इतके श्रेष्ठत्व देण्याचे कारण, " भक्ति-ज्ञानाची माउली " असल्यामुळे " न मातुःपर दैवतं " ह्या सिद्धान्तान्वयें ती मुक्तिदायक ज्ञानाचेहि आद्यवंद्यस्थान आहे, आणि आत्मरतिरूपानें अंतीं तिला ज्ञानमर्यादाही येतेच. पूर्णज्ञानी पुरुषालाहि गुरुभक्ति अत्यंत आदरणीय असते.

सूत्र ४. यल्लब्ध्वा पुमान् सिद्धो भवत्यमृतो भवति तृप्तो भवति ॥

आर्या. भक्तिच सिद्धावस्था, देउनि जीवास अमरही करिते ॥
तृप्ती निरंकुशा मग, सहजचि साईप्रसाद दे भक्ता ॥

**विवरणः—** केळीला केळफूल आले, म्हणजे जसे तिचे कार्य संपून ती मरून जाते, तद्वत् **"कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः"** (भ. गी. ३-२०) ह्या भगवदुक्त्यन्वये सकल कर्में, **म्हणजे सत्कर्में** (भ. गी. १७-२६) **म्हणतां येतील अशीं प्रशस्त कर्में,** सफल झालीं म्हणजे त्याच्यापासून त्याच्या कर्त्याला संसिद्धावस्था प्राप्त होऊन तीं सर्व कर्में त्या अवस्थेंत पूर्णत्वे निरुपयोगी होतात. अर्थात् सिद्ध पुरुष कर्मातीत असतो. हाच अर्थ आमच्या पूर्वसंकल्पानुसार श्रीमद्भगवद्गीतान्वये सांगितल्यास असे म्हणावे लागेल कीं, द्विविधा असलेल्या एकाच ब्रह्मनिष्ठेतील (भ. गी. ३-३) **कर्मयोगनामक पूर्वभाग संसिद्धिदायक** झाला, म्हणजे त्या नंतर साधक कर्मसंन्यास करून **परासिद्धिदायक** (मुक्तिदायक) **ज्ञाननिष्ठा नामक उत्तर भागाचा** आश्रय करितो (भ. गी. १८-४९ ते ५५) त्याची बुद्धि **व्यवसायात्मिका** ( परमेश्वरैकनिष्ठ ) असल्यामुळे त्याच्याकडून फक्त ईश्वरार्पणास योग्य असलेल्या सत्कर्माशिवाय कोणतेहि कर्म बुद्धिपुरःसर होणें शक्य नसल्यामुळें कर्मस्वरूपाचा विचार करण्याचे त्याला कांहींच प्रयोजन नसतें. भक्त्युद्भव हा अशा प्रकारें कृतकार्यत्व देऊन व साधकाला अमर करून नित्य तृप्त ठेवतो, अशीं जीं त्याचीं तीन फळें ह्या सूत्रात सांगितलीं आहेत, त्यांचे विवरण मागील भक्तिस्वरूप वर्णनांत झालें असल्यामुळें त्याचा येथे अनुवाद करण्याचे प्रयोजन नाहीं. उद्भवापासून सफलतेपर्यंत ह्या **व्यवसायात्मिका** बुद्धीचीं **"मृदु" "मध्य"** आणि **"अतिमात्र"** अशीं वृद्धिंगत होणारीं तीन स्वरूपे असून,त्याचीं फळेहि तशींच वृद्धिंगत होणारीं असतात.सूत्रस्थ **"लब्ध्वा"** ह्या पदाने प्रथम **"मृदु"** स्वरूपी पूर्वसत्कर्मफलभूत असलेला भक्त्युद्भव सांगून त्याचीं फळें कथन केलीं आहेत. ह्या स्वरूपाचे उदाहरण असे आहेः—

**" सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम् ।**
**सामुद्रो हि तरंगः क्व च न समुद्रो हि तारंगः**

( अर्थ-आर्या. )

परमेशरूप मजहुनि, भिन्न नसे तरिहि नाथ तो माझा ।
जैसा तरंग असतो, सिंधूचा परि न तो तरंगाचा ॥

" जीवबुध्द्यात्वदंशकः" अशा बुद्धीचे हे वर्णन आहे. असे महद्भाग्य प्राप्त करून घेण्याचे काम फार कठीण आहे. दृढ वैराग्याशिवाय त्याची प्राप्ति होत नाहीं, असे साधकाना बजावून सांगण्यासाठीं श्री तुकाराम महाराजानीं " नायमात्मा बलहीनेन लभ्यः " ह्या श्रुत्यन्वये " चणे खावे लोखंडाचे ॥ तरी ब्रह्मपदीं नाचे ॥ " आणि " तुका म्हणे भक्ति सुळावरिल पोळी ॥ ज्याचे असे कपाळीं त्यासि मिळे ॥ " अशीं स्पष्ट विधाने केलीं आहेत. वैराग्यरूप आत्मपुण्याशिवाय भक्त्युद्भवास पुण्यवंशहि प्रायः लागतोच. " दातृत्वं वंश पुण्येन " हा सिद्धांत वंशपुण्य नसलेल्या अनेक महाराजाच्या कृपणतेनें आणि त्यांच्याच पुत्रादिकाच्या औदार्यानें प्रस्थापित केला आहे. असे आनुवंशिक संस्काराद्वारे जिवास मिळणारे सहाय लक्षात आणूनच " तुका म्हणे येथें पाहिजे जातीचे ॥ येर गबाळाचें काम नाहीं ॥ " अशी संतवाणी उद्भवली आहे. आरबी घोडयांची पैदास आरबी नरमादीशिवाय होत नाहीं. अस्सल शिकारी कुत्र्याची पैदास अस्सल शिकारी नरमादीशिवाय होत नाहीं. ह्या नियमानुसार योगभ्रष्ट पुरुष ईशकृपेने प्रायः पुण्यवान् श्रीमंताच्या किंवा योगी पुरुषाच्या कुळातच जन्म पावतात—( भ. गी. ६–४० ते ४२ ). सारांश, व्यवसायात्मिका बुद्धीचा लाभ होण्यास अवश्य असलेल्या आत्मपुण्याला वंशपुण्याचाहि जोड लागतेच, असा सामान्य नियम आहे. म्हणूनच ती फार दुर्लभ आहे. "चणे आहेत तिथें दांत नाहींत, आणि दांत आहेत तिथें चणे नाहींत " असा प्रकार प्रायः सर्वत्र होत असल्यामुळें " क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे " अशीच अवस्था सदोदित दृष्टीस पडते; आणि ह्याच कारणास्तव प्रस्तुत सूत्रोक्त सिद्धावस्था प्राप्त करून देणाऱ्या वेदोक्तप्रशस्त सत्कर्माकडे कोणाचीहि प्रवृत्ति होत नाहीं.

**सूत्र ५.** यत्प्राप्य न किंचिद्वांच्छति न शोचति न द्वेष्टि न रमते नोत्साही भवति ॥

**आर्या.** साई अंकित होतां, सारीं द्वंद्वें समूळ मावळती ॥
तत्प्रेमाविण पुढतीं, उत्साहातें नसेचि स्थान दुजें ॥

**विवरण.** मागील सूत्रात सांगितल्याप्रमाणे कृतकार्य झालेल्या सिद्ध पुरुषाच्या अंतःकरणात भक्त्युद्भव झाला म्हणजे पुढे तद्द्वारा **"देव भावाचा भुकेला। दास सेवकाचा झाला॥"** ह्या सतोक्तीप्रमाणे **"मी देवाचा भक्त"** ही भावना जाऊन तिच्याऐवजीं **"देव माझा आहे"** अशी देवावरील आपल्या सत्तेची भावना उत्पन्न होते. हेंच एकांतिक भक्तीचें द्वितीय **"मध्य"** स्वरूप होय. असा चौथ्या सूत्रातील **"लब्ध्वा"** आणि ह्या सूत्रातील **"प्राप्य"** ह्या दोन शब्दाच्या अर्थामधील भेद आहे. ह्या **मध्य** स्वरूपाचें उदाहरण असे आहे

" हस्तमुत्क्षिप्य यातोसि बलात्कृष्ण किमद्भुतम् ॥
हृदयाद्यदि निर्यासि पौरुषं गणयामि ते ॥

( अर्थ—शार्दूलविक्रीडित )

हस्तातें हिसडूनि तूं निजबळें दूरी मला सोडिलें ।
ऐशानें पुरुषत्व काय तुजला कृष्णा सख्या जोडिलें ॥
चित्तीं मीं तुजला निरंतर असे बांधूनि ठेवीयला ॥
तेथूनी जरि जासि पौरुष तुझें मानेल खासें मला ॥

साराश, उपास्यमय झालेल्या सदुपासकाच्या दृढ प्रेमापुढे उपास्यदेवाचें बळ काय चालणार ? श्री तुकोबारायांनीं म्हटल्याप्रमाणे **"तुज नांव नाहीं तर माझें दाव कायी।"** अशा प्रकारें देवाशीं प्रेमानें भांडण्याचा त्यांचा अधिकार असतो ! ते देवाशीं वाटेल तितकी सलगी करतील, देवाची हवी तशी बरोबरी करतील, विनोदानें देवासमक्ष अथवा त्याच्या पाठीमागें त्याचा अपमानहि करतील. कारण देव आपला आहे, अशी त्यांची

पक्की खात्री असते. दातांनीं जीभ चावली म्हणून दातावर जसे कोणी रागावत नाहीं, तद्वत् सद्भक्ताचे असे सर्व चाळे देव निमूटपणे सहन करतो. फार काय सांगावे? भृगूने देवाचे सत्व पाहण्यासाठीं त्याच्या छातींत लाथ मारिली, तिची खूण भूषण म्हणून देव सतत धारण करीत आहे!! कर्मातीत झालेल्या अनन्य भक्ताना कोणतींहि कर्में बाधक होत नाहींत, इतकाच ह्याचा अर्थ आहे !!! हा कर्मातीत न झालेल्या असिद्ध कर्मयोग्याचा अधिकार खास नव्हे. असो. आता भक्तीच्या ह्या मध्य अवस्थेच्या सूत्रोक्त फलाचा विचार करूं. कल्पतरु, कामधेनु, चिंतामणि, इत्यादिकाना त्याचे अलौकिक सामर्थ्य देणारा परमात्मा ज्याने आपल्या भक्तिबलाने स्ववश करून घेतला, त्याचा सकल योगक्षेम यथास्थित रीतीने चालविण्याचे काम प्रत्यक्ष त्या परमात्म्यानेच आपल्या शिरावर घेतलेले असते ( भ. गी. ९–२२ ) अशी त्याची पूर्ण खात्री असल्यामुळे तो सहजच निर्वासनाचित्त झालेला असतो; आणि त्याच कारणास्तव त्याला **वांच्छा, शोक, द्वेष** इत्यादि अनर्थकारक मनोविकाराची बाधा होणे शक्य नसल्याच्या योगानें कोणतीहि आधिभौतिक सुखदायक वस्तु त्याला आपल्याठायीं **रममाण** करण्यास असमर्थ असते. त्याच्या अखंड पूर्णानंदाला ओहोटी लागण्याचा मुळींच संभव नसल्याकारणाने तो उत्साहपूर्वक कोणत्याहि कार्यार्थ प्रवृत्त होत नाहीं. साराश, तो इच्छा (काम), द्वेष (क्रोध), सुख, दु.ख, इत्यादि सकल व्यावहारिक द्वंद्वापासून मुक्त होऊन फक्त आपल्या उपासनानंदात ( भ. गी. १२-१४ ते १९ ) सदा सर्वदा निमग्न असतो. आपल्या संतलीलामृतात अशीं उदाहरणें पुष्कळ आहेत.

**सूत्र ६.** **यज्ज्ञात्वा मत्तो भवति स्तब्धो भवति आत्मारामो भवति ॥**

**आर्या** **जीवेशैक्यज्ञानें, मत्त मनीं शांत भीति नच कांहीं ॥**
**आत्मानंदीं रमतो, अंतीं निजधाम देत तया सांई ॥**

**विवरण:**—ह्या सूत्रांत " **ज्ञात्वा** " ह्या शब्दाने महावाक्योपदेशजन्य पूर्णाद्वैत अंतिम भक्तीच्या " **अतिमात्र** " स्वरूपाचें फल सांगितलें आहे. त्याचें उदाहरण असें आहे:—

" सकलमिदमहं च वासुदेवः परमं पुमान्परमेश्वरः स एकः।
इति मतिरचला भवत्यनंतं हृदयगते व्रज तान्विहाय दूरात् ॥

( अर्थ—साकी )

विश्व अखिल हें निजदेहासह हरिरूपचि तें आहे।
ऐशी अखंड दृढ मति ज्याची अमर खचित तो होये ॥
यम सांगे दूतां। तेथें तुमची नच सत्ता ॥

येथे सर्व वैदिक महावाक्यांच्या बोधाची परिसमाप्ति होऊन, शुद्ध भक्तिप्रधान असलेल्या केवल प्रशस्त सत्कर्मयोगानें ( भ. गी. १७–२३ ते २७ ) ईशप्रसादपूर्वक जीवेशैक्य ज्ञानद्वारा आत्मलाभ होऊन जिवाची ह्या अनित्य, जड, निरानंदमय, मायिक संसृतिबंधांतून मुक्तता होते, असे प्रतिपादन केले आहे. सूत्रस्थ "मत्त" ह्या शब्दाचा अर्थ "निःस्पृहस्य तृणं जगत्" ह्या सिद्धान्तान्वयें " पूर्णत्वे स्वतंत्र" असा असून "स्तब्ध" ह्या शब्दाचा अर्थ " परमनैष्कर्म्यसिद्धिद्वारें शांतचित्त झालेला" (भ. गी. १८-४९ ते ५५ ), असा आहे.

"यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ॥
आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥ (भ. गी. ३-१७)

( अर्थ-समश्लोक-वामनपंडितकृत )

आत्मत्वींच जया प्रीति। आत्मलाभेंचि तृप्त जो।
जो आत्मत्वींच संतुष्ट। त्याला कर्तव्य हें नसे ॥

ह्या भगवदुक्तीशीं प्रस्तुत सूत्रांतील "आत्मारामः" ह्या पदाचा उत्तम मेळ बसतो. श्लोकातील "कार्यं" ह्या शब्दावरून आत्मज्ञानी पुरुष कर्तव्यातीत असतो, असा अर्थ स्पष्ट होतो. आणि ज्ञानी पुरुषाच्या कर्तव्यकर्मातीततेचें कारण असें आहे कीं, ह्या अखिल जगताचें पूर्ण मिथ्यात्व त्याला समजूत पक्कें उमजलें असल्यामुळें त्याची :

" अव्यक्तादीनिभूतानि व्यक्त मध्यानिभारत।
अव्यक्त निधनान्येव तत्र का परिदेवना ॥ " (भ. गी. २-२८)

( अर्थ-समश्लोक )

भूतांचा आदि अव्यक्तीं, व्यक्त मध्येंचि दीसतो ।
अव्यक्तींच लया जाती, त्यांचा खेद न तो करी ॥

ह्या भगवदुक्त्यन्वये " **आपुलिया दृष्टीसि देखे। जगचि मुक्त** ॥ " अशी भावना झालेली असते. द्वितीय सूत्राच्या विवरणात उद्धृत केलेल्या अनुगीतेतील अध्याय ५१, श्लोक २९ ह्यामधील भगवान् श्रीकृष्णाच्या उक्तीवरून " **मम** " ही भावना मूर्तिमत मृत्यु होय, असें सिद्ध होते; आणि " **निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति** " ( भ. गी. २--७१ ) ह्या भगवदुक्तीप्रमाणेहि **अहंममता** गेल्याशिवाय ज्ञानोद्भूत शांतिलाभ होत नाहीं असेच ठरतें. अर्थात् अपरिहार्य देह प्रारब्धकर्माशिवाय ज्ञानी पुरुषाकडून कोणतेहि अप्राप्त कर्म घडत नाहीं, असा सर्वोपनिषद् सारभूत असलेल्या श्रीमद्भगवद्गीतेचा सिद्धांत असल्याकारणाने कर्मातीत झालेल्या ज्ञानकर्म-समुच्चयविहीन ज्ञानी पुरुषाकडून ह्या अखिल विश्वाची जरी होळी झाली, तरी अहंममता राहिल्यामुळे तिचे कर्तृत्व त्याच्याकडे जात नसल्या कारणाने तो त्या कर्मापासून सर्वथा पूर्णत्वे अलिप्त असतो. ( भ. गी. १८-१७ ) असें भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेच्या उपसंहाराध्यायात अर्जुनास सांगून नंतर गीतोपदेशाच्या **अंत्य** श्लोकद्वयांत ( भ. गी. १८-६५, ६६ ) **अर्जुनाच्या अज्ञानजनित पापभीतीच्या निवारणास फक्त एकांतिक भक्ति हाच एक उपाय आहे, अशा गुह्यतम उपदेशाने गीतोपसंहाराध्यायाची समाप्ति केली आहे;** हेच महाभारतातील पंचरत्नामध्यें भगवद्गीतेला आद्य-स्थान देण्याचे मुख्य कारण आहे. "**चहूं पुरुषार्थां शिरीं । भक्ति जैशी**" (ज्ञानेश्वरी १८-८६७ ) ह्या गीतोपसंहारानुगामी उक्तीप्रमाणे ज्ञानोत्तर भक्ति ( आत्मरति भ. गी. ३-१७ ) हीच सकल पुरुषार्थांचा कळस होय; कारण "**माझिये सहजस्थिति । भक्तिनाम** " (ज्ञानेश्वरी १८. ११२३) ह्या वाक्याप्रमाणें ती ब्रह्मस्वरूपच आहे. हेंच **भक्तीचें अतिमात्र** ( अंतिम ) स्वरूप प्रस्तुत सूत्रांत त्याच्या फलांसह वर्णिले आहे. भगवद्गीतेतील उपक्रमा-

ध्यायातीं जी अंतिम साध्य असलेली ब्राह्मीस्थिति सांगितली आहे, तिचें वर्णन श्रीमन्नारदानीं ह्या आपल्या प्रारंभींच्या षट्सूत्रांत केलें आहे; आणि भगवद्गीतेत उपक्रमाध्यायातील तात्पर्याचाच जसा पुढील सोळा अध्यायांत विस्तार झालेला आहे, तद्वत् ह्या प्रथम सूत्रषट्काच्या तात्पर्याचाच विस्तार पुढील अठ्याहत्तर सूत्रांत केलेला आहे.

**सूत्र ७.** सा न कामयमाना निरोधरूपत्वात् ॥
**आर्या.** इंद्रियनिरोधरूपी, भक्ति असे ईप्सितार्थ न च कांहीं ॥
सत्कर्में कांईला, अर्पण केल्याविना न ती लाभे ॥

**विवरण.** येथून सूत्र १४ अखेरपर्यंत **कर्मातीत सिद्धांची** मनःस्थिति कशी असते, ते सांगितलें आहे. पुढील सूत्रें ५६ आणि ५७ ह्यामध्यें गौण भक्ति कथन केली आहे. ती कामनिक होय. तरी तिच्यामध्येहि केवळ भगवदेकशरणता असतेच हीच भावना भक्तींत मुख्य लागते. म्हणजे संवादिभ्रमन्यायाने सकाम भक्तीच पुढें स्वभावतः निष्काम बनते. ह्याच कारणास्तव सकाम आणि निष्काम अशा द्विविध ऐकांतिक भक्तांना समान लेखून त्या उभयतांना भगवान् श्रीकृष्णांनीं "**उदार**" ही संज्ञा दिली आहे ( भ. गी. ७--१६ ते १९ ) इतकेंच नव्हे, परंतु "**वासुदेवः सर्वमिति**" अशा भावनेने ऐकांतिक भक्ति करणारांना भगवान् श्रीकृष्ण "महात्मा" म्हणत आहेत. मग त्याची भक्ति सकाम असो वा निष्काम असो.

"अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।"
तेषां नित्याभियुक्तानां योग्यक्षेमं वहाम्यहम् ॥"
( भ. गी. ९--२२ )

( अर्थ-आर्या-मोरोपंत )

मातेंचि अन्य टाकुनि, चिंतिति भजती धनंजया जन जे ॥
ते नित्ययुक्त त्यांच्या योगक्षेमासि वाहतों मीची ॥

असें म्हणणाऱ्या भगवंताशीं ऐकांतिक निष्ठेने योगक्षेमार्थ अजाणपणे याचना केली तर त्यात दोष काय ? उपमन्यु, ध्रुव इत्यादिक ऐकांतिक निष्ठेने भगवताची भक्ति करणाराची योग्यता काय कमी होती ? कामनिक भक्ति करण्याने भगवताचे स्थानमहात्म्य थोडेच कमी आहे ? कामनिक भक्ति असेल तर प्रथमत: कामना पूर्ण होऊन नंतर मुक्ति मिळणार, आणि निष्काम भक्ति असेल तर मुक्ति मिळणार इतकाच सकाम व निष्काम भक्तीच्या फलात फरक आहे. म्हणजे अर्थात् सकाम भक्तिपेक्षा निष्काम भक्ति श्रेष्ठ आहेच. आणि अनंत पूर्वजन्मार्जित प्रशस्त सत्कर्माच्या साफल्याने कर्मातीत झालेल्या सिद्ध पुरुषाचेच मागील तीन सूत्रात वर्णन केले असल्यामुळे त्याच्या श्रेष्ठ निष्काम भक्तीचीच ह्या सूत्रात प्रशंसा केली आहे. बाकी

" अपवित्रः पवितो वा सर्वावस्थांगतोपि वा ।
यः स्मरेत्पुंडरिकाक्षं स बाह्याभ्यंतरः शुचिः ॥"

( अर्थ-साकी )

पवित्र वा अपवित्र असे नर कवण्याहीपरि राह ।
श्रीहरि चिंतन करितां शुचि तो अंतर्बाह्यचि आहे ॥

हे सत्य त्रिकालाबाधित आहे, इतकेच नव्हे, परंतु—

न कळतां पद अग्निवरी पडे । न करि दाह असे न कधीं घडे ॥
अजित नाम वदो भलत्या मिषे । सकल पातक भस्म करीतसे ॥

हे नाममहात्म्यहि तसेच आहे, असे वाल्मीकादिकाच्या उदाहरणावरून सिद्ध होत आहे. अंतःकरणात ऐकांतिक भक्त्युद्भव होणें हेच आधीं फार कठीण आहे, मग तो निष्काम असणे त्याच्याहूनहि अधिक कठीण आहे, हे सांगावयासच नको. हा विचार मनात आणूनच श्री मुकुंदराजांनीं

"आधीं आत्मयातें जाणावें । मग तयाते साधावें ॥
एरवीं नुसतें अनुभवावे । काय म्हणनी ॥ "

( अपूर्ण )

## श्रीसमर्थ साईनाथ बाबा संस्थान शिर्डी शके १८४९ आषाढी गुरुपौर्णिमेचे उत्सवाप्रीत्यर्थ झडती एकंदर.

### जमे.

६२।≡॥ पेटींपैकी आमदानी.

२५६।० भक्तमंडळींकडून आलेल्या मनिऑर्डर्स बमोजी तपशीली लीस्ट सोबत पेश आहे.

६८। हस्तें श्रीमत भैयासाहेब
१६ ,, रा. रामचंद्रराव पाटील
५६। ,, ,, तात्या पाटील
११५॥। ,, दाभोळकरसाहेब

२५६।०

४२०॥~ श्रीमत केशवरावसाहेब बुटी यांचे कडून.

७३९।॥

### नांवें.

६११।= मुदबक खर्च

६९८= गहू ३ मण ४ पायली
७८८= तांदूळ ३ म. ३ पा.
२०।= डाळ तुरीची -।।।- म. ३ पा.
४।≡। डाळ हरभऱ्याची ४ पा.
१५।=॥ गरा १ म. १६ शेर
९८~ वेसन ३६। शेर

११६८~॥ तूप

१७८८॥- पत्रावळी व द्रोण
३९।।।- गूळ
३५॥= साखर २।।। म. १ शेर
१।≡॥ मीठ
१८= आमसूल
१८॥~॥ गोडें तेल ३०॥ शेर
१५।।।- साखऱ्या १ म. ८ शेर
।~ मेथी
८≡ हळद
१॥ बदाम १ शेर
१ किसमीस १ शेर
।≡ खडीसाखर
॥≡।।। शेंगदाणे
८= जिरें
।~ संठ
॥=॥ खोबरें
१।।।~ कापड वार ४ भांडें उचलण्याकरितां
२॥ मिरची २॥ शेर
।~ साबूदाणा
२ कढईचें भाडें

नांवें.

४ भिकारवाडा स्वयंपाक मजुरी
-॥।- केशर
३९८- नऱ्गी सामान तयारी वगैरे
४॥। घडाभाडें सामान आणणे
१५।- चरण
९॥।ॾ शाकभाजी
२७८= दहीं, दूध वगैरे
२॥८॥। भोजन दक्षणा
५ दक्षणा ह. रामचंद्रराव पाटील.
८० आचारी पुरुषोत्तम
३॥ मजुरी भिकार भोजन
५।= घोड्याकडे खर्च गवत, हरभरें

६११।=

९॥८- पानसुपारी
३॥।ॾ। सुपारी ५।
-॥।- काथ
१॥- विड्याचीं पानें
-।- अत्तर
-॥।- लवंग
१ वेलदोडे
१८- विड्या, आगपेट्या

९॥८।

११।ॾ॥ पुजेचें सामान
२८- खारीक बुका कापूर
।- ॥= १८=
२८ॾ॥ उदवत्ती नारळ उद
।ॾ -॥८॥ १।
२८ॾ मेणवत्ती चीलर सामान
१।- ॥।=
५ कमालखानी हार, तुरे

११।ॾ॥

नांवें.

७८~॥ प्रसाद तयारी हस्तें
रा. रामचंद्र पाटील
३५।= हस्तें रा. अण्णासाहेब दाभोळकर
।= पोस्टेज २। लेबल प्रसादा-
करितां
३२॥ आमंत्रणपत्रिका

३५।=

१०८~ कीर्तनाबद्दल खर्च
२० बॅंडबद्दल खर्च
१२।= घासलेट डबे ३
२२ गलेफ समाधीकरितां हस्तें
श्री. काकासाहेब महाजनी

७३१।८॥

## भक्त मंडळींकडून आलेल्या मनिऑर्डर्स.

२ मनिआर्डर्स ( नांव लागत नाहीं. )
२ रा. जी. डब्ल्यू. ब्यालर्ड मुंबई.
५ रामचंद्र वामन माडक, सांगली
५ द. कृ. ठाकूर, विजयदुर्ग
२ विश्वनाथ जुनकर

१६ मार्फत रा. रामचंद्रराव पाटील
२ रा. ज. रा. दळवी
५ ,, बापू भैया कोठारी
५ ,, आत्माराम दादू गावड
१।- ,, एम्. जी. कोरान्ने
५ ,, ए. के. कुळकर्णी
१ ,, हीरालाल बन्सीलाल
२॥ ,, गोपाळ हरी कोठारे
६ ,, लक्ष्मण लिंगोजी रेडे
२ ,, रावजी बाळकृष्ण उपासनी
२ ,, लक्ष्मणराव घोगे
२।- ,, नारायण दत्तात्रय व यशवंत रामराव
५ ,, पेंढारकर ललितकला संगीत नाटक मंडळी
१।- रा. परशुराम आपाजी नाचणे.
५ ,, गजानन महादेव वायगांवकर
१ ,, मोरेश्वर विष्णु जोशी
५ ,, भिकाजी नारायण पंडित
५ ,, दादा राळे

५६।- मार्फत रा. तात्या पाटील
२ रा. ज़ी. आर्. दाभोळकर.
१।- ,, महादेव जे. महाजन
२ ,, सी. आर्. चोनकर
२ ,, श्रीकृष्ण पुरुषोत्तम पाटील

३ रा. कानाग बाचा चौधरी
५ श्रीमती हिराबाई जगन्नाथ मुंबई
१० रा. सत्यवंत रामचंद्र मयेकर
२० ,, गोठसकर ब्यालर्ड इस्टेट
१ ,, रावजी महादू, वांद्रें
२ ,, शंकर भिकाजी मोहिते
२० ,, पुरंदरे

६८।- मार्फत श्री. भैयासाहेब बुटी

१० डॉ० के. व्ही. सावे
२ रा. बाबाजीराव आनंदराव मोहिले
५ ,, दाजी विठ्ठल सांबारे
२ ,, आनंदराव परशुराम डोळस
२ ,, हरीभाऊ विश्वनाथ चौबळ
२ ,, विनायक आपाजी वैद्य
३॥ ,, शामराव बी. कटक
२ ,, गंगाधर नारायण चौबळ
१॥ श्री. यशवदाबाई नारायण नाईक
५ रा. शंकर भास्कर रांगणेकर
५ ,, गंगाधर भास्कर रांगणेकर
२ ,, रामकृष्ण नाना वगळ
१।- ,, रामचंद्र आत्माराम तरखड
१।- ,, डी. जी. वैद्य
१।- ,, मुकुंद माधव मोहिले
१ ,, सौ. सिताबाई राजाराम वालावलकर
१ रा. वामनराव जनार्दन व्यवहारकर
१ ,, आनंदराव वामनराव, जनार्दन व्यवहारकर
२ ,, आत्माराम नथोबा जोशी
३ ,, लक्ष्मण दामोधर ठाकूर
५ ,, गोविंद नारायण सामंत
१। ,, शामराव आर्. जयकर
२॥ रा. एच्. बी. सिरसाटे
३ ,, वासुदेव सिताराम सामंत
२।= ,, सावळाराम आत्माराम शिरोडकर
-॥- ,, कृष्ण जागेश्वर भीष्म
२ ,, सदाशिव भाऊ नागवेकर
४ ,, परशुराम गंगाधर पंडित
५ ,, वामन सांबा केसरकर
५ ,, नारायण पुंडलिक सवार
५ ,, दत्तात्रय नारायण पळकर
३ ,, खंडेराव माधवराव विजयकर
३ ,, चिंतामण आर्. सातघरे
२ ,, आर्. एस्. सरफरे
१।- ,, रावसाहेब धोंडू विष्णु परुळकर
२॥- ,, बाळकृष्ण जयराम मंत्री
१।- ,, गणपतराव मोरेश्वर कोठारे
१ मिसेस् चंपूबाई गणपतराव कोठारे
१।- मिस् बावलीबाई नवलकर
१ रा. सदानंद विनायक तळपदे
१ ,, बाबूराव बाळकृष्ण राणे
६ ,, नारायण गणेश वागळे
  १ गणेश बळवंत वागळे
  ५ दिनकर मोरेश्वर पाटकर

  ६

१८= ,, नारायण गोविंद काळे
१ ,, सदाशिव विश्वनाथ देव
२ ,, सौ. सरस्वतीबाई कोठारे

११५॥। मार्फत रा. दाभोळकर

२५६। एकंदर

# चुकांची दुरुस्ती

१

श्री साईलीला वर्ष ५, अंक ४।५, पृष्ठ ६६१ वर १२ ज्या सदरांत " रा. सुंदरराव दिनानाथ नवलकर यांच्या कै. वा. भाऊ रान्नाथ " असें छापिलें आहे त्या ऐवजीं " कै. वडील मुलगा रामनाथ " असें वाचावें.

२

तसेच पृष्ठ ६७४ संपल्यावर, त्या पुढील मजकूर ६७६ ते ६७७ पानावरील प्यारा संपेपर्यंत वाचून नंतर पान ६७५ वाचावे व त्यापुढें पान ६७७ वरील ३ प्यारा वाचावा.

३

पृष्ठ ६४९ वर प्रसिद्ध झालेल्या श्रीरामनवमीचे उत्सवाचे जमे बाजूस गोविंद रघुनाथ दाभोळकर यांचे मार्फत भक्तांकडून आलेल्या रु. १३७ च्या रकमेचा तपशीलः—

| | |
|---|---|
| १ | सौ. सीताबाई राजाराम वालावलकर |
| १० | दाजी विठ्ठल सांभारे |
| २ | यशवंत जनार्दन गाळवणकर |
| ५ | गोविंद नारायण सामंत |
| २ | राजाराम केशव वालावलकर |
| २ | पेमाजी नागुजी परदेशी |
| २॥- | शामराव भास्कर कंटक |
| २ | गं. वेणुबाई चितळे |
| १।-। | नारायण गोविंद काजळे |
| २ | गोविंद रघुनाथ दाभोळकर |
| २ | विनायक आपाजी वैद्य |
| २ | गंगाधर नारायण चौवळे |
| ४ | आनंदराव पुर्शराम डोळस |
| ५ | गोविंद नारायण दाभोळकर |

| | |
|---|---|
| ५ | सौ. यमुनाबाई अण्णाजी सखाराम सामत |
| ५ | बाळकृष्ण भिकाजी ऊर्फ दादा परब |
| ५ | सौ. सिताबाई रामचंद्र सामंत |
| २८-। | शामराव रामचंद्र जयकर |
| १। | गणेश दिनकर वैद्य |
| २ | मिसेस सिताबाई वैद्य |
| २॥ | सावळाराम राजाराम शिरोळकर |
| १। | वासुदेव सावळाराम शिरोळकर |
| १। | रामकृष्ण सावळाराम शिरोळकर |
| १। | आत्माराम सावळाराम शिरोळकर |
| १। | सौ. राधाबाई सावळाराम शिरोळकर |
| १। | सौ. लक्ष्मीबाई वासुदेव शिरोळकर |
| १ | बी. व्ही. वैद्य |
| २ | पुरुषोत्तम गोपाळदास घडीयाळी |
| २५ | वासुदेव महादेव कोलंगडे |
| ५ | डी. आर. बापट |
| ४ | आत्माराम नथोबा जोशी |
| १ | लक्ष्मण गोविंद मुंगी |
| १ | कृष्णराव लक्ष्मण मुंगी |
| १ | दत्तात्रय लक्ष्मण मुंगी |
| १ | सौ. जानकीबाई मुंगी |
| ५ | उद्धव नारायण नवगीरी |
| १० | डॉ. रंगनाथ नारायण गवाणकर |
| ५ | गोविंद काशीनाथ गाडगीळ |
| ५ | श्री. बगुबाई करंजेकर |
| १३८८=॥ | |
| १८=॥ | पोस्टेज वगैरे खर्च वजा |
| १३७ | |

॥ ॐश्रीगुरुसांईराम ॥

॥ सदरील ग्रंथात अंक ॥

॥ अंक दुसरा ॥

नाही ॥

॥ [illegible] ॥